## जोडपत्र - 2
## जोखीम प्रकटन दस्तऐवज

एक्सचेंज अभिव्यक्तपणे किंवा गर्भितार्थाने या प्रकटन दस्तऐवजाच्या पूर्णत्वाची, पर्याप्ततेची किंवा अचूकतेची हमी देत नाहीत किंवा एक्सचेंजने याचा पुरस्कार केलेला नाही किंवा कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज (Commodity Derivatives) मार्केट/व्यवहारातील सहभागाच्या कोणतीही गुणवत्ता पारित केलेली नाही. हे संक्षिप्त विधान व्यवहारातील सर्व जोखमी आणि इतर महत्त्वाचे पैलू उघड करत नाही. त्यामुळे डेरिव्हेटिव्जचे व्यवहारामध्ये सहभागी होण्यापूर्वी तुम्ही त्याचा काळजीपूर्वक अभ्यास करावा.

यातील जोखमी विचारात घेता तुम्ही ज्या प्रकारचे करारात्मक संबंध जोडत आहात आणि ज्या जोखमींना तुम्ही सामोरे जाणार आहात त्याचे स्वरुप तुम्हाला समजत असेल तरच तुम्ही व्यवहार करावेत.

तुम्हाला माहीत असले पाहिजे आणि तुम्ही मान्य केले पाहिजे कि  कमॉडिटी एक्सचेंज(जेस)(Commodity Exchanges)वर व्यवहार केल्या जाणारे कमॉडिटी फ्युचर्स करार/डेरिव्हेटिव्ज किंवा इतर संलेख, ज्यात जोखमीचे विविध घटक असतात, ते सर्वसाधारणपणे अत्यंत मर्यादित स्रोत/मर्यादित गुंतवणूक आणि/किंवा व्यवहाराचा अनुभव आणि जोखीम सहन करण्याची मर्यादित क्षमता असलेल्या व्यक्तिंसाठी तरी उचित मार्ग नाही. त्यामुळे तुमच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता अशा प्रकारचे व्यवहार तुमच्यासाठी सोयीचे आहेत का याचा तुम्ही गंभीरपणे विचार करावा. जर तुम्ही  एक्सचेंजवर व्यवहार केलात आणि काही विपरित परिणाम किंवा नुकसान झाले तर त्यासाठी फक्त तुम्हीच जबाबदार असाल आणि त्यासाठी  एक्सचेंज कोणत्याही प्रकारे जबाबदार नसतील आणि तुम्ही असा युक्तीवाद करू शकणार नाही कि त्यातील जोखमींचे पुरेसे प्रकटन करण्यात आले नव्हते किंवा संबंधित सदस्याने त्यातील जोखमींची पूर्ण कल्पना तुम्हाला दिलेली नव्हती. परिणामांसाठी फक्त अशीलच जबाबदार असतील आणि त्यापायी कोणताही करार विखंडित करता येणार नाही.

तम्ही हे मानले आणि स्वीकारले पाहिजे कि एक्सचेंजवर कमॉडिटी डेरिव्हेटिव्जच्या खरेदी आणि/किंवा विक्रीचे आदेश निष्पादित करताना नफ्याची कोणतीही हमी नाही किंवा होणाऱ्या नुकसानासाठी कोणताही अपवाद केला जात नाही.

तुम्ही हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे कि एखाद्या सदस्यामार्फत केलेले तुमचे व्यवहार तुमच्या सदस्याने निश्चीत केलेल्या काही औपचारिकतांची, ज्यात *इतर विषयांबरोबरच* तुमचा ग्राहक जाणून घ्या प्रपत्र, हक्क आणि कर्तव्यांचे वाचन, कराव्यात आणि करू नयेत अशा काही गोष्टी, वगैरेंचा समावेश असू शकेल, तुमच्याकडून पूर्तता केली जाण्याच्या अधीन असतील आणि ते संबंधित एक्सचेंज, SEBIने  वेळोवेळी अमलात असलेली मार्गदर्शक तत्त्वे आणि  एक्सचेंजकडून किंवा वेळोवेळी अंमलात असलेली परिपत्रके यांच्या अधीन असतील.

एक्सचेंज कोणताही सल्ला देत नाहीत किंवा तसा त्यांचा हेतूही नसतो आणि या दस्तऐवजातील कोणत्याही माहीतीच्या आधारे कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही सदस्याबरोबर आणि/किंवा तृतीय पक्षाबरोबर स्थापित केलेल्या व्यावसायिक संबंधांसाठी ते जबाबदार नसतील. या दस्तऐवजात असलेली कोणतीही माहिती व्यावसायिक सल्ला/गुंतवणूक सल्ला मानू नये. कोणत्याही व्यवहाराचा विचार अशा व्यवहारात असलेल्या जोखमी पूर्णपणे समजून घेतल्याशिवाय किंवा त्यांचा आढावा घेतल्याशिवाय करू नये. तुम्हाला खात्री नसेल तर, तुम्ही त्याबाबतीत व्यावसायिक सल्ला घेतला पाहिजे.

व्यवहार करण्याचा  विचार करताना, तुम्हाला खालील गोष्टींची माहिती असावी किंवा त्या तुम्ही नीटपणे समजून घ्याव्यातः-

1. **कमॉडिटी फ्युचर करारांच्या व्यवहारामध्ये आणि एक्सचेंजच्या इतर कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज साधनांमध्ये समाविष्ट असलेल्या पायाभूत जोखमी.**

   i. **अधिक उच्च चंचलतेच्या जोखमी**

   चंचलता म्हणजे जेव्हा कमॉडिटी एक्सचेंजेसवर व्यवहार चालू असतात तेव्हा एखाद्या  कमॉडिटी डेरिव्हेटिव कराराच्या किंमतीत होणारे गतिशील बदल. सर्वसाधारणपणे, एखाद्या कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज करारातील चंचलता जेवढी मोठी, तेवढेच त्यांच्या किंमतीतील चढ-उतार मोठे असतात. सामान्यपणे, कमी व्यवहार होणाऱ्या कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज करारांतील चंचलता सक्रियपणे व्यवहार केलेल्या कमॉडिटीज(Commodities)/करारांपेक्षा मोठी असते. चंचलतेच्या परिणामी, तुमच्या आदेशाची अंशतः कार्यवाही केली जाऊ शकेल किंवा अजिबात केली जाऊ शकणार नाही, किंवा तुमच्या आदेशाची कार्यवाही ज्या किंमतीला केली गेली असेल ती शेवटच्या व्यवहारातील किंमतीपेक्षा खूप वेगळी असू शकेल किंवा नंतर खूप बदलू शकेल, परिणामी खरोखरीचे नुकसान होऊ शकेल.

   ii. **कमी रोकडसुलभतेची जोखीम**

   a. रोकडसुलभतेचा अर्थ बाजारातील कमॉडिटी डेरिव्हेटीव्ज करार एका स्पर्धात्मक किंमतीला आणि किंमतीतील किमान फरकाने तातडीने खरेदी करण्याची/विकण्याची सहभागींची क्षमता. सर्वसाधारणपणे, असे गृहित धरले जाते कि बाजारात उपलब्ध असलेल्या आदेशांची संख्या जेवढी जास्त तेवढी रोकडसुलभता मोठी. रोकडसुलभता महत्त्वाची आहे कारण मोठ्या रोकडसुलभतेमुळे गुंतवणूकदाराला कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज करार जलद आणि किंमतीतील कमीत कमी फरकाने खरेदी करणे आणि/किंवा विकणे सोपे जाते, आणि परिणामी, खरेदी केलेल्या किंवा विकलेल्या कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज करारांसाठी गुंतवणूकदार स्पर्धात्मक किंमत देण्याची किंवा त्याला ती मिळण्याची शक्यता जास्त असते. काही कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज करारांमध्ये सक्रिय सिक्युरिटीज/डेरिव्हेटिव्ज करारांच्या तुलनेत कमी रोकडसुलभतेची जोखीम असू शकेल. परिणामी, तुमच्या आदेशाची केवळ अंशतः कार्यवाही केली जाऊ शकेल किंवा तुलनेने अधिक किंमतीला कार्यवाही केली जाऊ शकेल किंवा अजिबात केली जाऊ शकणार नाही.
   b. रोजच्या व्यवहाराच्या धोरणाचा एक भाग म्हणून ठराविक कमॉडिटीजची डिलिव्हरी देण्याच्या हेतूविना आणि/किंवा डिलिव्हरी न घेता खरेदी/विक्री करणे करणे किंवा विक्री करणे याच्या परिणामी सुद्धा नुकसान होऊ शकते, कारण अशा परिस्थितीत  कमॉडिटी डेरिव्हेटिव करारांचे स्क्वेअर-ऑफ अपेक्षित किंमतीच्या पातळीच्या तुलनेत कमी/जास्त किंमतीला करणे भाग पडते, जेणेकरून अशा कमॉडिटीज डिलीव्हर करण्यासाठी/ मिळवण्यासाठी कोणतेही दायित्व राहू नये.

iii. **विस्ताराची जोखीम**

a. विस्ताराचा संदर्भ खरेदीच्या आणि विक्रीच्या उत्तम किंमतीतील फरकाशी आहे. एखादी कमॉडिटी डेरिव्हेटिव खरेदी करणे आणि ताबडतोब ते विकणे यातील सर्वोत्तम खरेदी किंमत आणि सर्वोत्तम विक्री किंमत यांतील फरकाचे ते निदर्शक आहे. कमी रोकडसुलभता आणि उच्च चंचलता याचा परिणाम कमी रोकडसुलभ किंवा अरोकडसुलभ कमॉडिटीज/कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज करारांसाठी सामान्यापेक्षा विशाल फरकात होऊ शकतो. त्यामुळे अधिक चांगली किंमत मिळण्यात अडथळा होण्यात होऊ शकतो.

\

iv. **जोखीम कमी करणारे आदेश**

a. बहुतांश एक्सचेंजेसमध्ये गुंतवणूक दारांसाठी "लिमीट ऑर्डर्स", "स्टॉप लॉस ऑर्डर्स" इ. देण्याची सुविधा असते. काही ठराविक रकमेपर्यंत नुकसान सीमित ठेवणारे आदेश (उदा.: "स्टॉप लॉस" ऑर्डर्स, किंवा "लिमीट" ऑर्डर्स) देणे अनेक वेळा प्रभावी ठरत नाही कारण बाजारातील गतिमान परिस्थितीमुळे अशा आदेशांची कार्यवाही करणे अशक्य होऊ शकते.

b. जर विरुद्ध बाजूकडून आदेश उपलब्ध असतील, तर किंमतीचा विचार न करता एखाद्या “मार्केट" आदेशाची कार्यवाही झटपट केली जाईल, आणि जरी ग्राहकाच्या “मार्केट" आदेशावर कार्यवाही झटपट केली जाऊ शकेल, तरीही ही कार्यवाही थकित आदेशांसाठी आणि उपलब्ध किंमतीवर असेल, ज्याने आदेशित संख्या किंमत-वेळ प्राधान्यावर पूर्ण होईल. पण हे समजून घेतले जावे कि या किंमती कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज कराराच्या शेवटच्या व्यवहारातील किंमतीपेक्षा किंवा त्यांच्या सर्वोत्तम किंमतीपेक्षा खूप वेगळया असू शकतील.

c. एखाद्या "लिमीट" आदेशाची कार्यवाही केवळ आदेशासाठी निश्चित केलेल्या "लिमीट" किंमतीला किंवा अधिक चांगल्या किंमतीला केली जाईल. तथापि, अशिलाला किंमतीविषयी संरक्षण मिळते पण त्याच वेळी अशीही शक्यता आहे कि आदेशाची अजिबात कार्यवाही केली जाऊ शकणार नाही.

d. स्टॉप लॉस आदेश साधारणपणे एखाद्या कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज कराराच्या चालू किंमतीपासून "दूर” जातो, आणि करार स्टॉप किंमतीपर्यंत पोचला किंवा त्या किंमतींवर व्यवहार झाला तर असा आदेश सक्रिय केला जातो. विक्रीचे स्टॉप आदेश सामान्यपणे चालू किंमतीच्या खाली नोंदविले जातात, आणि खरेदीचे स्टॉप आदेश सामान्यपणे चालू किंमतीच्या वर नोंदविले जातात. जेव्हा करार पूर्व-निश्चीत किंमतीपर्यंत पोचतात, किंवा अशा किंमतींवर व्यवहार केला जातो, स्टॉप लॉस आदेशाचे रुपांतर मार्केट/लिमीट आदेशात होते आणि आणि मर्यादेवर किंवा अधिक चांगल्या किंमतीवर कार्यवाही होते. त्यामुळे लिमीट आदेशाची कार्यवाही करता येईल याची कोणतीही हमी नाही कारण एखादी करार पूर्व-निश्चीत किंमत भेदू शकेल, आणि असे झाल्यास अशा आदेशावर कार्यवाही न होण्याची जोखीम उद्भवू शकेल, अगदी तसेच जसे एखाद्या नियमित लिमीट आदेशाच्या बाबतीत होते.

v. **बातम्यांच्या घोषणांची जोखीम**

a. व्यापारी/उत्पादक बातम्यांची घोषणा करतात ज्याचा कमॉडिटीज आणि/किंवा कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज कराराच्या किंमतींना प्रभावीत करू शकतात. ह्या घोषणा व्यापारा दरम्यान आणि त्याच्या जोडीला कमी रोकडसुलभता आणि उच्च चंचलता असेल तेव्हा होऊ शकतात, तर त्यामुळे कमॉडिटी/कमॉडिटी डेरिव्हेडिव्जच्या किंमतीत अचानक अनपेक्षित सकारात्मक किंवा नकारात्मक चढउतार होऊ शकतील.

vi. **अफवांची जोखीम**

a. अनेक वेळा कमॉडिटीच्या किंमती विषयी तोंडोतोंडी, वर्तमानपत्रातून, वेबसाइट्सवरून किंवा न्यूज एजन्सीज इत्यादिंद्वारे अफवा पसरविल्या जातात, गुंतवणूकदारांनी याबाबत सावध रहावे आणि अफवांच्या आधारे कृती करण्यापासून परावृत्त व्हावे.

vii. **प्रणाली जोखीम**

a. बाजार उघडण्यापूर्वी आणि बंद होण्यापूर्वी उच्च राशी व्यवहार वारंवार होतील. असे उच्च राशी व्यहार दिवसातील इतर वेळा देखील होऊ शकतील. त्यामुळे आदेशांच्या कार्यवाहीत किंवा पुष्टीकरणात दिरंगाई होऊ शकेल.
b. चंचलतेच्या कालावधींमध्ये, बाजारातील सहभागींद्वारा त्यांच्या आदेशात किंवा किंमतीत सातत्याने बदल केल्याने किंवा नवीन आदेश दिल्याने, आदेशाच्या कार्यवाहीत किंवा पुष्टीकरणात दिरंगाई होऊ शकेल.
c. बाजारातील काही विशिष्ट परिस्थितीत, बाजारातील एखाद्या स्थितीचे परिसमापन वास्तव किंमतीला करणे कठिण होऊ शकेल किंवा अजिबात करता येऊ शकणार नाही, जेव्हा विक्रीच्या बाजूने किंवा खरेदीच्या बाजूने कोणतेही शिल्लक आदेश नसतील किंवा व्यवहारातील कोणत्याही असामान्य कृतीमुळे किंवा किंमत सर्किट फिल्टर्सपर्यंत पोचल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणासाठी एखाद्या कमॉडिटी करारातील व्यवहार थांबविले जातील.

viii. **प्रणाली/नेटवर्कवरील गर्दी**

a. एक्सचेंजेसमधील व्यवहार, आदेश घेणे व मार्गस्थ करणे, हे उपग्रह/लीज्ड लाइन आधारित कम्युनिकेशन, तंत्रज्ञाने आणि संगणक प्रणालींचा संयोग यांच्या आधारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने चालते. अशा प्रकारे, तिथे कम्युनिकेशन बंद पडणे किंवा प्रणालीतील समस्या किंवा प्रणालीकडून मंद किंवा उशीराने प्रतिसाद मिळणे किंवा व्यवहार बंद होणे, किंवा अशा इतर कोणत्याही समस्या/अडचणी येण्याची शक्यता असते, ज्यामुळे व्यवहाराच्या प्रणाली/नेटवर्कपर्यंत पोचणे शक्य होत नाही, जे नियंत्रणाबाहेर असू शकेल आणि त्याचा परिणाम खरेदी किंवा विक्रीच्या आदेशांवर प्रक्रिया करण्यात अंशतः किंवा पूर्णपणे दिरंगाई होणे किंवा प्रक्रिया न होण्यात होऊ शकेल. तुम्हाला नोंद घेण्याचा इशारा देण्यात येतो कि जरी या समस्या तात्पुरत्या स्वरुपाच्या असतात, तरी जेव्हा तुमच्यापाशी थकित खुली स्थिती किंवा कार्यवाही न झालेले आदेश असतात तेव्हा सर्व कार्यवाही झालेले व्यवहार पूर्ण करण्याच्या तुमच्या कर्तव्याला ही जोखीम आडवी येऊ शकते.

2. **जेथपर्यंत फ्युचर्स कमॉडिटी डेरिव्हेटिव्जचा संबंध आहे, कृपया नोंद घ्या आणि खालील अतिरिक्त वैशिष्ट्यांशी स्वतःला चांगले परिचित करून घ्याः-**

   **"लीव्हरेज" किंवा "गिअरिंग" चा परिणाम:**

   a. कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज कराराच्या मूल्याच्या मानाने भांडवल गुंतवणूकीची रक्कम छोटी असते, त्यामुळे व्यवहार 'लीव्हरेज' किंवा 'गिअर्ड' केले जातात. कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज व्यवहार तसे छोट्या मार्जीनच्या रकमेने केले जातात, पण ते मार्जीनच्या तुलनेत मोठा नफा किंवा नुकसान होण्याची शक्यता देतात. पण कमॉडिटी डेरिव्हेटिव्जमधील व्यवहारात मोठी जोखीम असते. म्हणून प्रत्यक्षात कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज करारांमध्ये व्यवहार करण्यापूर्वी तुम्ही पुढील विधाने पूर्णपणे समजून घ्यावीत आणि आपली परिस्थिती, आर्थिक स्रोत वगैरे सुद्धा विचारात घेऊन व्यवहार करावा.
   b. फ्युचर्स कमॉडिटी डेरिव्हेटिव्जमध्ये व्यवहार करण्यामध्ये सर्व स्थितींची रोज व्यवहारपूर्ति समाविष्ट आहे. रोज खुल्या स्थिती बंद किंमतीच्या आधारे बाजारात चिन्हांकित केल्या जातात. जर बंद किंमत तुमच्या विरोधात पुढे सरकली असेल, तर तुम्हाला अशा हालचालीतून होणाऱ्या नुकसानाची (अनुमानित) रक्कम जमा करावी लागेल. हे मार्जिन एका विशिष्ट ठरवून दिलेल्या कालावधीच्या आत, साधारणपणे पुढच्या दिवसाचे व्यवहार सुरू होण्यापूर्वी, प्रदान करावी लागते.
   c. तुम्ही ठरवून दिलेल्या वेळेपूर्वी मार्जिन जमा करू शकला नाहीत किंवा तुमच्या खात्यात थकबाकी असेल तर, एक्सचेंजचा सदस्य (Members/ Stock Brokers)स्थितींचे संपूर्णपणे किंवा अंशतः परिसमापन/स्क्वेअर-अप करून देऊ शकेल. या बाबतीत, अशा स्क्वेअर-अप/ क्लोज-आउट्समुळे होणाऱ्या कोणत्याही नुकसानासाठी तुम्हीच जबाबदार असाल.
   d. बाजारातील काही विशिष्ट परिस्थितींत, एखाद्या गुंतवणूकदाराला व्यवहारांची कार्यवाही करणे कठिण किंवा अशक्य ठरू शकते. उदाहरणार्थ, ही परिस्थिती अरोकडसुलभता, म्हणजे जेव्हा बिड्स किंवा ऑफर्स पुरेशा नसतात, किंवा किंमतीवरील बंधनांमुळे किंवा सर्किट ब्रेकर्समुळे वगैरे व्यवहार निलंबित असतात, अशामुळे येऊ शकते.
   e. पावले, जसे की मार्जीनच्या दरातील बदल, कॅश मार्जीन इ. बाजारातील स्थैर्य राखण्याच्या दृष्टीने स्वीकारले जाऊ शकते.  या नवीन उपाययोजना विद्यमान खुल्या हितसंबंधाना सुद्धा लागू केल्या जाऊ शकतात. अशा परिस्थितीत, तुम्हाला अतिरिक्त मार्जीन ठेवावे लागेल किंवा तुमची स्थिती कमी करावी लागेल.
   f. तुम्ही तुमच्या एक्सचेंजच्या सदस्याला तुम्ही व्यवहार करण्याचे योजत असलेल्या कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज करारांचा संपूर्ण तपशील विचारला पाहिजे, अर्थात, कराराची विनिर्दिष्टे आणि संलग्न कर्तव्ये.

3. **वायरलेस तंत्रज्ञान किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानामार्फत व्यवहार करणे:**

   वायरलेस तंत्रज्ञान किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानामार्फत कमॉडिटी व्यवहार करण्याशी संबंधित वैशिष्ट्ये, जोखमी, जबाबदाऱ्या, कर्तव्ये आणि दायित्वे यांची व्याख्या करणाऱ्या कोणत्याही तरतूदी सदस्याने ग्राहकाच्या नजरेला आणाव्यात.

## 4. सर्वसाधारण

i. **जमा केलेली रोकड आणि मालमत्ता:**
तुम्ही जमा करत असलेला पैसा किंवा इतर मालमत्तेच्या संरक्षणाबाबत तुम्ही स्वतः ओळख करून घेतली पाहिजे, खास करून जर फर्म नादार किंवा दिवाळखोर झाल्याच्या घटनेमध्ये. तुमचा पैसा किंवा मालमत्ता तुम्ही ज्या प्रमाणात परत मिळवू शकता ती मर्यादा विशिष्ट कायदे किंवा स्थानिक नियमांनुसार ठरू शकतात. काही न्यायाधिकारक्षेत्रांमध्ये, जी मालमत्ता विशेष करून तुमची म्हणून ओळखली गेली आहे ती तूट निर्माण झाल्यास रोख रक्कमेसारखीच प्रो-रेट केली जाईल. एक्सचेंजच्या सदस्यासह विवाद निर्माण झाल्यास, तो एक्सचेंजच्या नियम, उपकलमे आणि व्यावसायिक नियमांनुसार लवादाच्या कार्यवाहीच्या अधीन असेल.

ii. **कमिशन आणि इतर शुल्क**
तुम्ही व्यवहार करायला सुरुवात करण्यापूर्वी, तुमच्यावर ज्या कमिशन, फी आणि इतर शुल्कांचे दायित्व आहे त्यांबाबत स्पष्ट स्पष्टीकरण मिळवले पाहिजे. हे शुल्क तुमच्या निव्वळ नफ्यावर परिणाम करेल (काही असल्यास) किंवा तुमचे नुकसान वाढवू शकेल.

iii. सदस्य/अधिकृत व्यक्ती/ग्राहकांच्या (client / investor)अधिकार आणि दायित्वांसाठी, कृपया *जोडपत्र 3 चा* संदर्भ घ्या

iv. 'घटक' शब्दाचा अर्थ असेल आणि त्यात समाविष्ट असतील एखादे अशील, एखादा ग्राहक, किंवा एखादा गुंतवणूकदार, जो एक्सचेंजेसद्वारे पुरविण्यात आलेल्या यंत्रणेमार्फत कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज सदस्यामार्फत व्यवहार करतो.

v. 'सदस्य' शब्दाचा अर्थ असेल आणि त्यात समाविष्ट असतील एखादा व्यवहार सदस्य किंवा सदस्य/ब्रोकर, ज्याला एक्सचेंजेसनी तसे दाखल करून घेतले आहे आणि जो SEBI कडील नोंदणी प्रमाणपत्र मिळतो.

## जोडपत्र–3 (KYC दस्तऐवजांचे)
## सदस्य (Member/ Stock Brokers), अधिकृत व्यक्ती (Authorised Persons) आणि ग्राहकाचे (Client/investor) ग्राहका हक्क आणि कर्तव्ये /SEBI आणि कमॉडिटी एक्सचेंजेसनी (Commodity Exchanges) विहीत केल्याप्रमाणे

1. ग्राहक त्याच कमॉडिटीज(Commodities)/करारात/इतर सलेखांमध्ये गुंतवणूक/ करतील ज्यांना एक्सचेंजेस/SEBIच्या नियम, उपकलमे आणि व्यावसायिक नियम/ नियमनांमध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे आणि त्याखाली वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांनुसार/नोटीसांनुसार व्यवहारांसाठी मान्यता दिली गेली आहे.

2. सदस्य, अधिकृत व्यक्ती आणि ग्राहक एक्सचेंजेसचे नियम, उपकलमे आणि व्यावसायिक नियम आणि त्याखाली निर्गमित केलेल्या परिपत्रकांशी/नोटीसेसशी आणि /SEBIच्या नियम आणि नियमनांशी आणि वेळोवेळी अंमलात असू शकतील अशा सरकारी प्राधीकरणांच्या अधिसूचनांशी बांधील असतील.

3. ग्राहक सदस्याच्या कमॉडिटिज(Commodities)आणि/किंवा डेरिव्हेटिव्ज करारांमध्ये व्यवहार करण्याच्या क्षमतेबाबत आणि सदस्यामार्फत आदेशांची कार्यवाही करण्याची इच्छा आहे, याबाबत स्वतःचे समाधान करून घ्यावे आणि ग्राहकाने सदस्यामार्फत आदेशांची कार्यवाही करण्यापूर्वी अशा क्षमतेबाबत स्वतःचे समाधान करून घेणे वेळोवेळी चालूच ठेवावे.

4. सदस्याने ग्राहकाचा अस्सलपणा आणि आर्थिक भक्कमपणाबाबत आणि पुरविण्यात येणाऱ्या सेवांशी संबंधित गुंतवणूकींच्या उद्दिष्टांबाबत सातत्याने समाधान करून घ्यावे.

5. सदस्याने ग्राहकाला कोणत्याही मर्यादा, दायित्वे आणि सदस्य ज्या क्षमतेत काम करतो त्यासह करावयाच्या व्यवसायासाठी सदस्याच्या दायित्वाच्या नेमक्या स्वरुपाबाबत जागरुक करावे.

6. व्यावसायिक व्यासंगाच्या आवश्यकता
    a. वित्तीय करारामध्ये प्रवेश करताना किंवा त्याअंतर्गत कोणतीही दायित्वे फेडताना सदस्याने व्यावसायिक व्यासंगाचे पालन केले पाहिजे.
    b. “व्यावसायिक व्यासंग” म्हणजे अशा कौशल्य आणि काळजीचे मानक जे सदस्याने ग्राहकाबाबत वाजवी अंमलात आणणे अपेक्षित असेल, पुढील गोष्टींच्या योग्य प्रमाणात–
    i. प्रामाणिक बाजार पध्दती;
    ii. सद्भावाचे तत्व;
    iii. ग्राहकाचे ज्ञान, अनुभव आणि कौशल्याची पातळी;
    iv. ग्राहक घेत असलेल्या वित्तीय उत्पादन* किंवा वित्तीय सेवांमध्ये असलेल्या जोखमीचे स्वरूप आणि प्रमाण आणि
    v. ग्राहक सदस्यावर किती अवलंबून आहे.

*कमॉडिटी डेरिवेटिव (Commodity Derivatives)कॉन्ट्रॅक्ट

7. अधिकृत व्यक्ती सदस्याला आवश्यक ते सहाय्य करेल आणि स्टॉक ब्रोकरला त्याच्या ग्राहका(लां) शी करण्यात येणाऱ्या सर्व व्यवहारांत सहकार्य करेल.

**ग्राहकाची माहिती**

8. ग्राहकाने "खाते उघडण्याच्या प्रपत्रात" सदस्याला आवश्यक असलेले सर्व तपशील कमॉडिटी एक्सचेंजेसने/SEBIने वेळोवेळी बंधनकारक केलेल्या समर्थनार्थ कागदपत्रांसह पुरवावा.

9. ग्राहकाने खाते उघडण्याच्या कागदपत्रांतील सर्व बंधनकारक तरतूदींशी स्वतःला चांगले परिचित करून घ्यावे. सदस्याने विनिर्दिष्टीत केलेली कोणतीही अतिरिक्त कलमे किंवा कागदपत्रे बंधनकारक नसतील; त्यामुळे, ग्राहकाद्वारे विशिष्ट स्वीकृतीच्या अधीन असतील.

10. ग्राहकाने खाते उघडताना आणि त्यानंतर 'खाते उघडण्याच्या प्रपत्रात' पुरविलेल्या माहितीत, परिसमापन विनंती अर्ज/नादारी विनंती अर्ज किंवा त्याच्या क्षमतेवर परिणाम करणाऱ्या कोणत्याही न्यायालयीन वादासह कोणत्याही बदलांबद्दल सदस्याला ताबडतोब लेखी अधिसूचित करावे. ग्राहकाने नियतकालीन तत्त्वावर सदस्याला आर्थिक माहिती पुरवावी/अद्यतन करावी.

11.A. वित्तीय करारातील अन्याय्य अटींचे संरक्षण**

a. वाटाघाटी न केलेल्या करारातील एखादी अन्याय्य अट निरर्थक असेल.
b. एखादी अट अन्याय्य आहे जर ती –
    i. ग्राहकाला नुकसान पोहोचवण्यासाठी, वित्तीय करारातील पक्षांच्या अधिकार व दायित्वांमध्ये ठळक असंतुलन निर्माण करत असेल; आणि
    ii. सदस्याच्या कायदेशीर हिताचे संरक्षण करण्यासाठी वाजवीपणे आवश्यक नसेल.
c. एखादी अट अन्याय्य आहे हे ठरवताना विचारात घेण्याच्या घटकांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो –
    i. वित्तीय करारांतर्गत ज्या वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवांचे स्वरूप हाताळले जात आहे;
    ii. अटीच्या पारदर्शकतेची व्याप्ती;

**कमॉडिटी एक्सचेंजेस(Commodity Exchanges)द्वारे देऊ केले जात असलेले करार

    iii. समान वित्तीय उत्पादने किंवा वित्तीय सेवांसाठी इतर वित्तीय करारांशी ह्या अटीची ग्राहकाला किती मर्यादेपर्यंत तुलना करता येईल; आणि
    iv. संपूर्ण वित्तीय करार आणि ज्या इतर कराराच्या अटींवर तो अवलंबून आहे.
d. एखादी अट पारदर्शक आहे जर –
    i. जी ग्राहकाला समजेल अशा वाजवीपणे साध्या भाषेत मांडलेली आहे;
    ii. वाचनीय आहे आणि स्पष्टपणे सादर केलेली आहे; आणि
    iii. अटीचा परिणाम होणाऱ्या ग्राहकासाठी सहज उपलब्ध आहे.

e. जर एखाद्या वित्तीय करारातील एखादी अट मुद्दा 11.A.c अंतर्गत अन्याय्य असल्याचे ठरवले गेले तर, त्या अन्याय्य अटीविना तो वित्तीय करार ज्या मर्यादेपर्यंत अंमलात आणता येणे शक्य असेल तोपर्यंत करारातील उर्वरित अटींद्वारे पक्ष बांधील राहणे चालू राहील.

11.B.

a. “वाटाघाटी न केलेला करार” म्हणजे एक असा करार, ज्याच्या अटींबाबत, मुद्दा 11.C. (खाली दिलेला) व्यतिरिक्त वित्तीय करारातील पक्षांमध्ये वाटाघाटी झालेल्या नाहीत आणि ज्यांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो –

   i. एक वित्तीय करार ज्यामध्ये, ग्राहकाच्या तुलनेत, वित्तीय कराराच्या अटी ठरविण्याचे भरीवपणे जास्त वाटाघाटी सामर्थ्य हे सदस्याकडे आहे; आणि

   ii. एक प्रमाणित करार स्वरूप.

b. “एक प्रमाणित करार स्वरूप” म्हणजे एक असा वित्तीय करार जो ग्राहकासाठी भरीवपणे वाटाघाटी न करण्यायोग्य आहे, मुद्दा 11.C. मध्ये असलेल्या अटींशिवाय.

c. जरी वित्तीय कराराच्या काही अटींबाबत वाटाघाटी झाल्या असल्या तरी, वित्तीय करार हा वाटाघाटी न केलेला करार समजला जातो जर तसे पुढील बाबींनी सूचित होत असेल –

   i. वित्तीय कराराचे एकूण आणि भरीव मूल्यांकन; आणि

   ii. वित्तीय कराराच्या भोवतीच्या भरीव परिस्थिती

d. एक वित्तीय करार हा वाटाघाटी न केलेला करार आहे अशा दाव्यामध्ये, अन्यथा प्रदर्शित करण्याचा भार सदस्याचा असेल.

11. C.

a. एखाद्या वित्तीय करारातील अटीला वरील गोष्टी लागू होत नाहीत जर ती –

   i. वित्तीय कराराची विषय वस्तू विषद करत असेल;

   ii. वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय करारांतर्गत असलेल्या वित्तीय सेवेसाठी अदा करण्याची किंवा देय असलेली किंमत निश्चित करते आणि ग्राहकाला ती स्पष्टपणे उघड करून सांगितलेली आहे; किंवा

   iii. कोणत्याही कायदा किंवा नियमनांतर्गत आवश्यक आहे किंवा तिला व्यक्तपणे परवानगी आहे.

b. 11.C अंतर्गतची सूट अशा अटीला लागू होत नाही जी अशा रक्कमेच्या प्रदानाशी निगडीत आहे जे कोणतीही विशिष्ट घटना घडण्याच्या किंवा न घडण्याच्या सापेक्ष आहे.

12. सदस्य आणि अधिकृत व्यक्तीनेने आणि सब-ब्रोकरने खाते उघडण्याच्या प्रपत्रात नमूद केलेल्याप्रमाणे ग्राहकाचा सर्व तपशील किंवा ग्राहकाच्या संबंधातील सर्व माहिती गोपनीय पद्धतीने राखावी आणि असे कि कोणत्याही कायदेशीर/नियामक आवश्यकतांखाली गरज असल्याशिवाय ती कोणत्याही व्यक्तीला/ अधिकाऱ्याला उघड करू नये. तथापि, सदस्य त्याच्या ग्राहकाविषयीची माहिती कोणत्याही व्यक्तीला किंवा अधिकाऱ्याला ग्राहकाच्या अभिव्यक्त परवानगीने उघड करू शकेल.

13. A. वैयक्तिक माहितीचे संरक्षण आणि गोपनीयता

a. “वैयक्तिक माहिती” म्हणजे अशी कोणतीही माहिती जी ग्राहकाशी संबंधित आहे किंवा जिच्यामुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ग्राहकाच्या ओळखीचे अनुमान लावता येते आणि ज्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश असतो –

i. नाव आणि संपर्क माहिती;
ii. जैवमेट्रिक माहिती, व्यक्तींच्या बाबतीत
iii. वित्तीय उत्पादनांतील व्यवहार किंवा धारणांशी संबंधित माहिती
iv. वित्तीय सेवांच्या वापराशी संबंधित माहिती; किंवा
v. अशी माहिती जी विनिर्दिष्ट केली जाऊ शकते.

13.B.

a. सदस्याने –

i. वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवेतील तरतुदीसाठी आवश्यक आहे त्याशिवाय ग्राहकाशी संबंधित जास्तीची वैयक्तिक माहिती संकलित करू नये;

ii. ग्राहकाशी संबंधित वैयक्तिक माहितीची गोपनियता राखावी आणि 13.B.b.मध्ये परवानगी असलेल्या व्यतिरिक्त व्यक्तपणे ती त्रयस्थ पक्षांकडे उघड करू नये;

iii. त्याच्याकडे असलेली ग्राहकाशी संबंधित कोणतीही वैयक्तिक माहिती अचूक, अद्ययावत आणि पूर्ण आहे याची खात्री करण्यासाठी सर्वोत्तम प्रयत्न करावे;

iv. नियामकाने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अपवादांच्या अधिन, अशिलांना त्यांच्या वैयक्तिक माहितीमध्ये वाजवी प्रवेश मिळू शकेल याची खात्री करावी; आणि

v. सदस्याकडे असलेली वैयक्तिक माहिती अचूक, अद्ययावत आणि पूर्ण आहे याची खात्री करण्यासाठी अशिलांना त्यांच्या वैयक्तिक माहितीमध्ये सुधारणा करण्याची प्रभावी संधी घेऊ द्यावी.

b. ग्राहकाशी संबंधित वैयक्तिक माहिती सदस्य त्रयस्थ पक्षाकडे तेव्हाच उघड करू शकतो जर –

i. ग्राहकाला संमती नाकारण्याची प्रभावी संधी दिल्यानंतर, प्रकटीकरणाबाबत त्याने ग्राहकाची पूर्व लेखी माहितीपूर्ण संमती मिळवलेली असेल;

ii. केल्या जाणाऱ्या प्रकटीकरणाबाबत ग्राहकाने आदेश दिले असतील;

iii. नियामकाने प्रकटीकरणास मान्यता किंवा तसा आदेश दिला असेल आणि संबंधित कायदा किंवा नियमनांद्वारे प्रतिबंधित असेल तर ग्राहकाला अशा प्रकटीकरणाविरुध्द अशा कायदे किंवा नियमनांतर्गत सादर करण्याची संधी दिलेली असेल;

iv. कोणत्याही कायदे किंवा नियमनांतर्गत प्रकटीकरण आवश्यक आहे आणि अशा कायदे किंवा नियमनांद्वारे प्रतिबंध केले नसेल तर अशा कायदे किंवा नियमनांनुसार अशा प्रकटीकरणाविरुध्द सादर करण्याची ग्राहकाला संधी दिलेली असेल;

v. प्रकटीकरण हे ग्राहकाच्या वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवेतील तरतुदींशी थेट संबंधित असेल जर, सदस्याने –

1. ग्राहकाला आगाऊ सूचित केले वैयक्तिक माहिती एखाद्या त्रयस्थ पक्षासह सामायित केली जाऊ शकते; आणि

2. ह्या भागामध्ये आवश्यक आहे त्याच पध्दतीने त्रयस्थ पक्ष वैयक्तिक माहितीची गोपनियता राखेल याची खात्री करण्यासाठीच्या तरतुदी करेल; किंवा

vi. प्रत्यक्ष किंवा संभाव्य फसवणूक, अनधिकृत व्यवहार किंवा दावे यांपासून संरक्षण करण्यासाठी किंवा त्यांना प्रतिबंध करण्यासाठी प्रकटीकरण केले गेले आहे, जर त्रयस्थ पक्षाने

ह्या भागांतर्गत आवश्यक असलेल्या वैयक्तिक माहितीची गोपनियता त्रयस्थ पक्षांपासून राखण्याची व्यवस्था केली.

c. “त्रयस्थ पक्ष” म्हणजे संबंधित सदस्या व्यतिरिक्त कोणतीही व्यक्ती, ह्यामध्ये सदस्य ज्या समुहाचा सदस्य आहे त्यात समाविष्ट व्यक्तीचा समावेश होतो.

14.A. प्रारंभी आणि निरंतर दोन्ही प्रकारे न्याय्य प्रकटीकरणाची आवश्यकता

a. माहितीपूर्ण व्यवहारासाठीचा निर्णय घेण्यासाठी आवश्यक असू शकेल अशा माहितीचे न्याय्य प्रकटीकरण केल्याची सदस्याने खात्री करावी.

b. न्याय्य प्रकटीकरण स्थापित करण्यासाठी, माहिती पुढीलप्रकारे प्रदान केली जावी –

i. ग्राहक वित्तीय करारामध्ये प्रवेश करण्याच्या बऱ्यापैकी आधी, ज्यामुळे ग्राहकाला माहिती समजण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल;

ii. लेखी आणि अशा पध्दतीने जी विशिष्ट श्रेणीतील ग्राहकाला समजण्याची शक्यता आहे; आणि

iii. ग्राहकाला वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवेची इतर समान वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवांसह वाजवी तुलना करता येईल अशा पध्दतीने.

c. वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवेशी संबंधित ग्राहकाकडे उघड केली जावी अशा माहितीचे प्रकार, ज्यामध्ये पुढील गोष्टींशी संबंधित माहितीचा समावेश होऊ शकतो –

i. वैशिष्ट्ये, लाभ आणि ग्राहकाला असलेल्या जोखमींसह वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवेची प्रमुख वैशिष्ट्ये;

ii. वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवेसाठी अदा करण्याचा मोबदला किंवा ज्या प्रकारे मोबदला मोजला जातो;

iii. वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय करारातील कोणत्याही अटीचे अस्तित्व, समावेशन किंवा प्रभाव;

iv. स्वरूप, गुणधर्म आणि सदस्याचे अधिकार ज्यामध्ये ओळख, नियामक स्थिती आणि संलग्नतेचा समावेश होतो;

v. सदस्याचे संपर्क तपशील आणि सदस्य आणि ग्राहकादरम्यानच्या पत्रव्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या पध्दती;

vi. एखादा करार विनिर्दिष्ट कालावधीमध्ये रद्द करण्याचे ग्राहकाचे अधिकार; किंवा

vii. कोणत्याही कायदा किंवा नियमनांतर्गत ग्राहकाचे अधिकार.

14.B.

a. सदस्याकडून वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवा घेणाऱ्या ग्राहकाला त्याने खालील निरंतर प्रकटीकरणे प्रदान करावी –

i. ग्राहकाने प्रारंभी जेव्हा वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवा घेतली तेव्हा 14.A मुद्द्यामध्ये उघड केलेल्या माहिती अंतर्गत आवश्यक असलेले कोणतेही भौतिक बदल;

ii. ग्राहकाकडे असलेल्या वित्तीय उत्पादनाच्या स्थिती किंवा कामगिरीशी संबंधित माहिती, जी वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवेतील अधिकार किंवा स्वारस्यांचे मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक असू शकेल; आणि

iii. विनिर्दिष्ट केली जाऊ शकते अशी कोणतीही माहिती.

b. निरंतर प्रकटीकरण केले जावे –

i. कोणताही भौतिक बदल झाल्यापासून वाजवी काळ मर्यादेमध्ये किंवा वाजवी नियतकालीक कालावधी मध्यांतरांना, लागू होत असले त्यानुसार; आणि

ii. लेखी आणि त्या श्रेणीतील ग्राहकाला समजेल अशा पध्दतीने.

**मार्जीन्स**

15. ज्या विभागांमध्ये ग्राहक व्यवहार करतो त्यांना वेळोवेळी लागू असल्याप्रमाणे, सदस्याला किंवा एक्सचेंजला आवश्यक वाटतात अशा किंवा SEBIने निर्देश दिलेला असू शकेल अशा प्रारंभिक मार्जीन्स, विथहोल्डिंग मार्जीन्स, स्पेशल मार्जीन्स किंवा अशाच इतर मार्जीन्सचे ग्राहक प्रदान करेल. सदस्याला संपूर्णपणे एकट्याच्या आणि निखालस स्वेच्छानिर्णयाने अतिरिक्त मार्जीन्स (जरी ती एक्सचेंजेस, किंवा SEBI द्वारा आवश्यक नसतील) वसूल करण्याची परवानगी आहे आणि ठरवून दिलेल्या वेळेच्या आत अशा मार्जीन्सचे प्रदान करण्यास ग्राहक कर्तव्यप्राप्त आहे.

16. ग्राहकाला हे समजते कि ग्राहकाद्वारे मार्जीन्सचे प्रदान म्हणजे सर्व देयांचे संपूर्ण समाधान असे गृहित असणे आवश्यक नाही. सातत्याने मार्जीन्स प्रदान केलेली असली तरीही, त्याच्या व्यवहाराच्या व्यवहारपूर्ततेसाठी, करार आदेश देईल/गरज असेल त्याप्रमाणे अशा आणखी रकमांचे प्रदान करण्यास ग्राहक कर्तव्यप्राप्त (किंवा प्राप्त करण्यास अधिकारी) असू शकेल.

**व्यवहार आणि व्यवहारपूर्ति**

17. ग्राहक कमॉडिटीज/डेरिव्हेटिव्ज करारांच्या खरेदीसाठी किंवा विक्रीसाठी, ग्राहक आणि सदस्य यांनी परस्परात मान्य केल्याप्रमाणे लेखी किंवा प्रपत्रातून किंवा पद्धतीने आदेश देईल तथापि सदस्य खात्री करेल की ह्या विषयातील नियामक आवश्यकतांची पूर्तता झाली आहे. सदस्य ग्राहकाच्या व्यवहाराचे आदेश देण्याची आणि त्यांवर कार्यवाही केवळ त्या ग्राहकाला नेमून दिलेल्या युनिक क्लाएंट कोडमध्ये करण्याची, खात्री करेल.

18. सदस्य ग्राहकाला व्यवहार/व्यवहारपूर्ति चक्र, डिलीव्हरी/प्रदानाचे नियोजन, त्यातील कोणत्याही बदलांची वेळोवेळी माहिती देत राहील, आणि जिथे व्यवहाराची कार्यवाही झाली आहे त्या संबंधित कमॉडिटी एक्सचेंजच्या अशा नियोजनांचे/कार्यपद्धतींचे अनुपालन करणे ही पर्यायाने ग्राहकाची जबाबदारी असेल.

19. सदस्य खात्री करेल कि ग्राहकाने जमा केलेले पैसे सदस्य त्याच्या स्वतःच्या किंवा इतर कोणत्याही ग्राहकाच्या खात्यापेक्षा वेगळया स्वतंत्र खात्यात जमा करेल आणि SEBIचे नियम, परिपत्रके, नोटीसेस, मार्गदर्शक तत्त्वे आणि/किंवा एक्सचेंजचे नियम, व्यावसायिक नियम, उपकलमे, परिपत्रके आणि नोटीसेस यात नमूद केलेल्या हेतूव्यतिरिक्त त्याच्या स्वतःसाठी किंवा इतर कोणत्याही ग्राहकासाठी वापरणार नाही.

20. जिथे एक्सचेंज स्वाधिकारात व्यवहार रद्द करते तेव्हा ग्राहकाच्या वतीने केलेले सर्व व्यवहार वस्तुतः रद्द सिद्ध होतात. अशा वेळी सदस्य ग्राहकाबरोबरचा संबंधित करार रद्द करू शकेल.

21. एक्सचेंजवर कार्यवाही केलेले व्यवहार जिथे व्यवहाराची कार्यवाही केली जाते त्या एक्सचेंजेसच्या नियमांच्या, उपकलमांच्या आणि व्यावसायिक नियमांच्या आणि त्याखाली निर्गमित केलेल्या

परिपत्रकांच्या/नोटीसेसच्या अधीन असतील आणि एक्सचेंजेसचे नियम, उपकलमे आणि व्यावसायिक नियम आणि त्याखाली निर्गमित केलेल्या परिपत्रकांना/नोटीसेसना प्रभावी करण्याच्या हेतूसाठी जिथे व्यवहाराची कार्यवाही केली जाते त्या एक्सचेंजेस्च्या उपकलमांत आणि व्यावसायिक नियमांत विनिर्दिष्टीत केलेल्या न्यायालयाचा न्यायाधिकार अशा व्यवहारातील सर्व पक्षांनी मान्य केलेला असावा.

**वटाव/दलाली**

22. ग्राहक सदस्याला वेळोवेळी अस्तित्वात असलेली आणि ग्राहकाच्या खात्याला, व्यवहारांना आणि सदस्याने ग्राहकाला दिलेल्या सेवेला लागू असतील त्याप्रमाणे दलाली आणि वैधानिक कर प्रदान करेल. सदस्य संबंधित कमॉडिटी एक्सचेंजेसचे नियम, व्यावसायिक नियम आणि उपकलमे आणि/किंवा SEBIचे नियम यानुसार अनुज्ञेय असलेल्या कमाल दलालीपेक्षा जास्त दलाली आकारणार नाही.

**परिसमापन आणि स्थितीचे क्लोज आउट**

23. सदस्याच्या इतर हक्कांना (प्रकरण लवादाकडे संदर्भित करण्याच्या हक्कासह) बाधा न येता, ग्राहकाला समजते कि सदस्य मार्जीन्स किंवा इतर रकमांचे, थकित ऋणांचे वगैरे प्रदान न करण्याबद्दल ग्राहकाच्या सर्व किंवा कोणत्याही स्थिती परिसमापित करण्यास/क्लोज आउट करण्यास आणि अशा परिसमापनाचे/क्लोज आउटचे उत्पन्न ग्राहकाच्या, काही असल्यास, दायित्वांसमक्ष /कर्तव्यांसमक्ष समायोजित करण्यास पात्र आहे. अशा परिसमापनाच्या/क्लोज आउटच्या खाती होणारे एखादे आणि सर्व नुकसान आणि आर्थिक आकार ग्राहकाला लावले जातील आणि तो ते वहन करेल.

24. ग्राहकाच्या मृत्यूच्या किंवा नादारीच्या प्रसंगात किंवा ग्राहकाने ज्या कमॉडिटीजच्या खरेदीसाठी किंवा विक्रीसाठी आदेश दिले असतील त्या प्राप्त करण्यासाठी किंवा त्यांच्यासाठी प्रदान करण्यास किंवा त्यांची डिलीव्हरी करण्यास तो अन्यथा असमर्थ ठरल्यास, सदस्य ग्राहकाचे व्यवहार क्लोज आउट करू शकेल आणि नुकसानाचा, काही असल्यास, ग्राहकाच्या मालमत्तेसमक्ष दावा करू शकेल. त्यातून उत्पन्न होणाऱ्या अधिशेषासाठी ग्राहक किंवा त्याचे नामनिर्देशिती, उत्तराधिकारी, वारस, आणि अभिहस्तांकिती पात्र असतील. ग्राहकाने नोंद घ्यावी कि नामनिर्देशितीच्या नावे निधी/कमॉडिटीजचे हस्तांतरण सदस्याद्वारे कायदेशीर वारसांच्या समक्ष वैध कार्यमुक्ती असेल.

**विवादांची सोडवणूक**

25. सदस्य त्याच्या मार्फत मार्गस्थ केलेल्या व्यवहारांच्या बाबतीत तक्रारींचे निराकरण करण्यात सहकार्य करेल.

26. ग्राहक आणि सदस्य ठेवी, मार्जीन मनी वगैरेंच्या बाबतीतील कोणतेही दावे आणि/किंवा विवाद जिथे व्यवहाराची कार्यवाही झाली त्या एक्सचेंजच्या नियमांप्रमाणे, उपकलमांप्रमाणे आणि व्यावसायिक नियमाप्रमाणे आणि त्याखाली निर्गमित केलेल्या वेळोवेळी अंमलात असलेल्या परिपत्रकानुसार/नोटीसेस प्रमाणे लवादाकडे संदर्भित करतील.

27. ग्राहक/सदस्य समजतात कि ग्राहक/सदस्याच्या विवादाच्या सोडवणूकीसाठी एखाद्या अधिकृत प्रतिनिधीने निर्गमित केलेल्या सूचना, काही असतील तर, सदरहू ग्राहक/सदस्याच्या वतीने व्यवहार करण्यासाठी सदरहू प्रतिनिधीला अधिकार देणाऱ्या पत्रानुसार त्या ग्राहक/सदस्यावर बंधनकारक असतील.

28. आपल्या सर्व अशिलांना पोहोचता येईल असे प्रभावी तक्रार निवारण तंत्र असणे ही प्रत्येक सदस्याची गरज आहे

a. सदस्याने किंवा त्याच्या वतीने प्रदान केलेल्या वित्तीय उत्पादने किंवा वित्तीय सेवांच्या बाबतीत आपल्या अशिलांकडून तक्रारी प्राप्त करणे आणि त्यांचे निवारण करणे यासाठी सदस्याकडे तंत्र आणि न्याय्य पध्दतीने प्रभावी तंत्र असले पाहिजे.

b. ग्राहकाबरोबर संबंध प्रस्थापित झाल्याबरोबर आणि ग्राहकाला ज्यावेळी आवश्यक असू शकेल अशा वेळी सदस्याने ग्राहकाला पुढील माहिती दिली पाहिजे –

i. कोणत्याही तक्रारींचे निवारण मिळण्याचा ग्राहकाचा अधिकार; आणि

ii. आपल्या अशिलांकडून तक्रारी प्राप्त करणे आणि त्यांचे निवारण करणे यासाठी सदस्य अनुसरत असलेल्या प्रक्रिया.

29. A. ग्राहकासाठी सल्ल्याची अनुरूपता

ग्राहकाच्या संबंधित वैयक्तिक परिस्थिती विचारात घेऊन अनुरूप सल्ला मिळण्याचा अधिकार, जसे की ग्राहकाच्या वित्तीय परिस्थिती आणि गरजा. हे दायित्व अशा व्यक्तींना लागू होते जे अशिलांना सल्ला देतात आणि असा सल्ला ज्या वित्तीय उत्पादने आणि सेवांना देणे आवश्यक असेल अशा श्रेणी नियामक विनिर्दिष्ट करू शकतो.

a. सदस्याने –

i. ग्राहकाच्या संबंधित वैयक्तिक परिस्थितींबाबत अचूक आणि पुरेशी माहिती मिळविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे; आणि

ii. ग्राहकाच्या संबंधित वैयक्तिक परिस्थितीचा योग्य विचार करून दिलेला सल्ला ग्राहकासाठी अनुरूप असल्याची खात्री करावी.

b. जर सदस्याला हे बऱ्यापैकी उघडपणे दिसत असेल की ग्राहकाच्या संबंधित वैयक्तिक परिस्थितींबाबतची उपलब्ध माहिती ही अपूर्ण किंवा चुकीची आहे तर, सदस्याने अपूर्ण किंवा चुकीच्या माहितीवर पुढे जाण्याच्या परिणामांबाबत ग्राहकाला चेतावणी द्यावी.

c. जर ग्राहकाची असे एखादे वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवा घेण्याची इच्छा असेल जे सदस्याने ग्राहकासाठी अनुरूप नाही असे ठरवले तर, सदस्याने –

i. आपला सल्ला ग्राहकाला लेखी आणि ग्राहकाला समजेल अशा पध्दतीने स्पष्टपणे कळवावा; आणि

ii. ग्राहकाने विनंती केलेले वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवा कलम 29.A.a ची पूर्तता केल्यावर आणि ग्राहकाकडून लेखी स्वीकृती मिळवल्यावरच केवळ प्रदान करावे.

30. हितसंघर्ष हाताळणे

ग्राहकाच्या आणि सदस्याच्या हिताबाबत काही संघर्ष निर्माण झाल्यास, ग्राहकाच्या हिताला प्राधान्य दिले जावे.

a. सदस्याने –

i. कोणत्याही प्रकारच्या हितसंघर्षांबाबत ग्राहकाला माहिती द्यावी, यामध्ये ग्राहकाला सल्ला दिल्याबद्दल सदस्याला मिळालेल्या किंवा मिळण्याचे अपेक्षित असलेल्या कोणत्याही प्रकारच्या मोबदल्याचाही समावेश होतो; आणि

ii. जर सदस्याला पुढील गोष्टींबाबत हितसंघर्ष माहीत असेल किंवा वाजवीरित्या जाणून घेता येत असेल, तर ग्राहकाच्या हिताला प्राधान्य द्यावे –

1. त्याचे स्वतःचे हीत आणि ग्राहकाचे हीत; किंवा

2. संबंधित सदस्याचे हीत आणि ग्राहकाचे हीत, जिथे सदस्य वित्तीय प्रतिनिधी असेल.

b. कलम 16a.i. अंतर्गत असलेली माहिती ग्राहकाला लेखी आणि ग्राहकाला समजेल अशा पध्दतीने द्यावी आणि माहिती मिळाल्याची लेखी स्वीकृती पावती ग्राहकाकडून घेतली जावी.

c. ह्या विभागामध्ये, "विवादास्पद मानधन" म्हणजे असा कोणताही आर्थिक किंवा आर्थिकेतर लाभ जो एखाद्या सदस्याने ग्राहका व्यतिरिक्तच्या व्यक्तींकडून मिळवला आहे, ज्यामुळे त्या परिस्थितीमध्ये सदस्याने ग्राहकाला दिलेल्या सल्ल्यावर परिणाम होण्याची वाजवी अपेक्षा केली जाऊ शकते.

**संबंधांची समाप्ती**

31. सदस्याचा कसूर, मृत्यू, राजीनामा किंवा हकालपट्टी किंवा एक्सचेंजने प्रमाणपत्र रद्द करणे यांसह कोणत्याही कारणाने सदस्याचे कमॉडिटी एक्सचेंजवर सभासदत्व रद्द झाल्यास सदस्य आणि ग्राहकाच्या दरम्यानचे हे संबंध समाप्त केले जातील.

32. सदस्य, अधिकृत व्यक्ती आणि ग्राहक अन्य पक्षांना किमान एक महिना आगाऊ लेखी नोटीस देऊन, अन्य पक्षाला कोणतेही कारण न देता त्यांच्या दरम्यानचे संबंध समाप्त करण्यास पात्र असतील. अशा कोणत्याही समाप्तीचा विचार न करता, या संबंधांच्या समाप्तीच्या पूर्वी करण्यात आलेल्या व्यवहारांतून उद्भवलेले किंवा त्या बाबतीतील सर्व हक्क, दायित्वे आणि कर्तव्ये अस्तित्वात राहतील आणि संबंधित पक्ष किंवा त्यांच्या वारसांवर, कार्यवाहकांवर, प्रशासकांवर, कायेदशीर प्रतिनिधींवर आणि उत्तराधिकाऱ्यांवर, जसे प्रकरण असेल तसे, निहीत असतील/बंधनकारक असतील.

33. अधिकृत व्यक्तीच्या मृत्यूच्या/नादारीच्या किंवा बोर्डाकडील त्याची नोंद रद्द होण्याच्या किंवा कमॉडिटी एक्सचेंजद्वारे अधिकृत व्यक्तीची मान्यता मागे घेतली जाण्याच्या आणि कोणत्याही असेल त्या कारणासाठी, सदस्याद्वारे अधिकृत व्यक्तीबरोबरचा करार समाप्त केला जाण्याच्या प्रसंगात, ग्राहकाला अशा समाप्तीबाबत कळविण्यात येईल आणि ग्राहक सदस्याचे थेट ग्राहक असल्याचे मानले जाईल आणि ग्राहकाने सदस्यालाला एक महिन्यापेक्षा कमी नसलेली लेखी सूचना देऊन त्यांचे संबंध समाप्त करण्याचा हेतू कळविल्याशिवाय, सदस्य, अधिकृत व्यक्ती आणि ग्राहकाला शासित करणारी 'हक्क आणि कर्तव्ये' कागदपत्रे अंमलात असतील तशीच पुढे चालू राहतील.

**अतिरिक्त हक्क आणि कर्तव्ये**

34. सदस्य आणि ग्राहक SEBIने आणि जिथे व्यवहाराची कार्यवाही करण्यात आली होती त्या संबंधित एक्सचेंजने निर्गमित केलेले नियम, व्यावसायिक नियम, उपकलमे, परिपत्रके, नोटीसेस आणि मार्गदर्शक तत्त्वे यानुसार त्यांच्या खात्यांचा वेळोवेळी ताळमेल घालतील आणि व्यवहारपूर्ति करतील.

35. सदस्य त्याच्या अशिलांना कार्यवाही केलेल्या व्यवहारांसाठी एक्सचेंजद्वारा विहीत केलेला असू शकेल अशा प्रारुपात वेळोवेळी एक कॉंट्रॅक्ट नोट देईल ज्यात आदेश क्रमांक, व्यवहार क्रमांक, व्यवहाराची वेळ, व्यवहाराची किंमत, व्यवहाराची राशी, डेरिव्हेटिव्ज कराराचा तपशील, ग्राहकाचा कोड, दलाली, लावलेले सर्व आकार वगैरे व्यवहारांच्या सर्व नोंदी असतील आणि इतर सर्व संबंधित तपशील असतील व जो

एक्सचेंजने विहीत केलेल्या पद्धतीने आणि वेळेच्या आत भरणे आणि देणे आवश्यक असेल. सदस्य व्यवहाराच्या कार्यावाहीपासून 24 तासांच्या आत हार्ड कॉपीत आणि/किंवा डिजीटल सहीचा वापर करून इलेक्ट्रॉनिक स्वरुपात गुंतवणूकदाराला कॉंट्रॅक्ट नोट पाठवेल.

36. ग्राहकाने अन्यथा विनिर्दिष्टीत केलेले असल्याशिवाय जिथे व्यवहाराची कार्यवाही करण्यात आली त्या संबंधित एक्सचेंजकडून पेआउटच्या प्राप्ती झाल्यावरआणि जिथे व्यवहाराची कार्यवाही करण्यात आली त्या संबंधित एक्सचेंजने विहीत केलेल्या असू शकतील अशा अटी आणि शर्तींच्या अधीन, जसे प्रकरण असेल तसे, एक्सचेंजचे नियम, उपकलमे, व्यावसायिक नियम आणि परिपत्रके यांप्रमाणे निधीचा पेआउट करेल किंवा कमॉडिटीजची डिलीव्हरी देईल.

37. सदस्य जिथे व्यवहाराची कार्यवाही केली जाते त्या संबंधित एक्सचेंजद्वारा वेळोवेळी विहीत केलेला असू शकेल अशा नियतकालाने आणि प्रारुपात अशा वेळेच्या आत, त्याच्या प्रत्येक ग्राहकाच्या संबंधातील निधी आणि कमॉडिटीज उभयतांचे संपूर्ण 'खाते विवरणपत्र' पाठवेल. विवरणपत्रात असेही विधान असेल कि ग्राहक, विवरणपत्रात काही चुका असल्या तर, सदस्याला (स्टॉक ब्रोकर) ते प्राप्त झाल्यापासून जिथे व्यवहार केला गेला त्या संबंधित एक्सचेंजद्वारे वेळोवेळी विहित केलेल्या वेळेत चुका कळवेल. .

38. सदस्य मार्जीन विवरणपत्र ग्राहकाला दररोज पाठवेल. मार्जीन विवरणपत्रात इतर बाबींबरोबरच, जमा केलले सांपार्श्वीक, विनियोग केलेले सांपार्श्वीक, आणि सांपार्श्वीकाची स्थिती (उपलब्ध शिल्लक/ग्राहकाकडून येणे) रोख, मुदत ठेव पावत्या (FDRs), बँक गॅरंटी, गोदाम पावत्या, सिक्युरिटीज इ. विभागणीसह तपशील समाविष्ट असावा.

39. ग्राहक सदस्याबरोबर संबंध स्थापित करण्यासाठी आवश्यक ती कायदेशीर क्षमता आणि त्याला तसा अधिकार असल्याची आणि याच्या खालील त्याची कर्तव्ये आणि वचनपत्रे पार पाडण्यास तो सक्षम असल्याची खात्री करेल. ग्राहक जे करू शकेल अशा सर्व व्यवहारांचे अनुपालन करण्याची खात्री करण्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व कृती ग्राहक असे व्यवहार करण्यापूर्वी पूर्ण करेल.

40. जिथे, एखादा सदस्य त्याचे/ तिचे/ त्यांचे सदस्यत्व परत करतो तिथे, सदस्य काही दावे असल्यास गुंतवणूकदारांनी ते दाखल करण्यासाठी सार्वजनिक सूचना देतो. एक्सचेंजच्या व्यवहार प्रणालीवर केलेल्या व्यवहारांबाबत काही दावा असल्यास, सुनिश्चित कालावधीमध्ये आणि सहाय्यक कागदपत्रांसह अशिल एक्सचेंजकडे दावा दाखल करेल याची खात्री करावी.

41.A. गैरवर्तनापासून संरक्षण ज्यामध्ये दिशाभूल करणारे वर्तन आणि अपमानास्पद वर्तनाचा समावेश होतो

a. वित्तीय उत्पादने किंवा वित्तीय सेवांशी निगडीत अन्याय्य पध्दतींना प्रतिबंध आहे.

b. “अन्याय्य वर्तन” म्हणजे सदस्य किंवा त्याच्या वित्तीय प्रतिनिधीची अशी कृती किंवा दोष ज्याचा माहितीपूर्ण संमती घेण्याच्या ग्राहकाच्या क्षणतेवर ठळक परिणाम होतो किंवा होऊ शकतो आणि ज्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो –

   i. कलम 41.B अंतर्गत दिशाभूल करणारे वर्तन

   ii. कलम 41.C अंतर्गत अपमानास्पद वर्तन

   iii. विनिर्दिष्ट केली जाऊ शकतील अशी इतर उत्पादने.

41.B.

a. एखादा घटक ठरविण्याबाबत सदस्य किंवा त्याच्या वित्तीय प्रतिनिधीचे वर्तन दिशाभूल करणारे मानले जाते जर त्यामुळे ग्राहकाला व्यवहाराचा असा निर्णय घ्यावा लागू शकतो जो ग्राहकाने अन्यथा घेतला नसता आणि ह्या वर्तनामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो –

   i. ग्राहकाला चुकीची किंवा सदस्य किंवा त्याच्या वित्तीय सल्लागाराला ती माहिती खरी असल्याचा विश्वास नाही अशी माहिती देणे; किंवा

   ii. फसव्या विषयाबाबत ग्राहकाला अचूक माहिती प्रदान करणे.

b. 41.B.a अंतर्गत एखादे आचरण दिशाभूल करणारे आहे का हे ठरवण्यामध्ये, खालील घटकांचा "निर्धारक घटक" म्हणून वापर करावा –

   i. वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवेच मुख्य वैशिष्ट्य, यामध्ये त्याची वैशिष्ट्ये, लाभ आणि ग्राहकाला असलेल्या जोखमींचा समावेश होतो;

   ii. विशिष्ट वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवेबाबतची ग्राहकाची गरज किंवा ग्राहकाबाबत त्याची अनुरूपता;

   iii. वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवेसाठी अदा करण्याचा मोबदला किंवा ज्या प्रकारे तो मोबदला मोजला जातो ती पध्दत;

   iv. वित्तीय करारातील कोणत्याही संज्ञेचे अस्तित्व, वर्जन किंवा प्रभाव, जी त्या वित्तीय कराराच्या विषयामध्ये भौतिक संज्ञा आहे;

   v. सदस्याची ओळख, नियामक स्थिती आणि संलग्नीकरणांसह त्याचे स्वरूप, गुणधर्म आणि अधिकार; आणि

   vi. कोणत्याही कायदा किंवा नियमांतर्गत ग्राहकाचे अधिकार.

41.C.

a. वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवांच्या बाबतीत सदस्य किंवा त्याच्या वित्तीय प्रतिनिधीचे वर्तन अपमानास्पद आहे जर –

   i. त्यामध्ये बळजबरी किंवा अयोग्य प्रभावाच्या वापराचा समावेश होतो; आणि

   ii. त्याची कारणे किंवा ग्राहकाने अन्यथा जो व्यवहारात्मक निर्णय घेतला नसता तो घेण्यास ग्राहकाला भाग पाडणे.

b. एखादे वर्तन बळजबरी किंवा अयोग्य प्रभावाचे आहे का हे ठरविण्यासाठी खालील गोष्टींचा विचार केला जावा –

   i. वर्तनाची वेळ, स्थान, स्वरूप किंवा चिकाटी;

   ii. धमकावणाऱ्या किंवा अपमानास्पद भाषेचा किंवा वर्तनाचा वापर;

   iii. वित्तीय उत्पादन किंवा वित्तीय सेवेच्या बाबतीत ग्राहकाच्या निर्णयावर परिणाम होऊ शकतो अशा ग्राहकाच्या कोणत्याही विशिष्ट दुर्दैवी घटनेची किंवा परिस्थितीची पिळवणूक, ज्याबाबत सदस्याला माहीत आहे;

   iv. सदस्याने लादलेले कोणतेही कराराबाहेरील अडथळे जिथे ग्राहकाला वित्तीय करारांतर्गत अधिकार वापरण्याची इच्छा आहे, यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो –

   v. वित्तीय करार रद्द करण्याचा अधिकार;

vi. दुसऱ्या वित्तीय उत्पादनास किंवा दुसऱ्या सदस्याकडे स्विच करण्याचा अधिकार आणि

vii. कोणतीही कारवाई करण्याची धमकी, ती धमकी कोणत्या परिस्थितीमध्ये दिली गेली आहे त्यानुसार.

**इलेक्ट्रॉनिक कॉंट्रॅक्ट नोट (ECN)**

42. ग्राहकाने इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील कॉंट्रॅक्ट नोट प्राप्त करण्याचा पर्याय स्वीकारला, तर तो सदस्याला उचित इमेल आयडी (ग्राहकाने तयार केलेला) पुरवेल (कृपया जोडपत्र 3 च्या परिशिष्ट A चा संदर्भ घ्या). सदस्याने खात्री करावी की ह्या विषयामध्ये जारी केलेले सर्व नियम/व्यावसायिक नियम/उपकलमे/परिपत्रके एकत्रित केलेली असतील. इमेल आयडी मधील कोणताही बदल ग्राहक सदस्याला प्रत्यक्ष पत्र पाठवून कळवेल. ग्राहकाने इंटरनेट व्यवहाराचा पर्याय स्वीकारला असेल, तर इमेल आयडीच्या बदलाची विनंती ग्राहकाच्या विशिष्ट आयडी आणि पासवर्डच्या सुरक्षित ॲक्सेसमार्फत करता येऊ शकेल.

43. इमेलमार्फत पाठविलेली ECN डिजीटल सही केलेली, एन्क्रिप्टेड आणि ढवळाढवळ न करता येणारी असेल आणि IT अधिनियम, 2000 च्या तरतूदींचे अनुपालन करणारी असेल याची सदस्य खात्री करेल. इमेल मार्फत पाठवलेली ECN जोडपत्र म्हणून पाठवली असेल, तर जोडपत्र म्हणून पाठवलेली फाइलसुद्धा डिजीटल सही, एन्क्रिप्शन आणि ढवळाढवळ न करता येणारी करून सुरक्षित केलेली असेल.

44. ग्राहकाने नोंद घ्यावी कि सदस्याला बाउन्स्ड मेल अधिसूचना प्राप्त न होणे म्हणजे ग्राहकाच्या इमेल आयडीवर कॉंट्रॅक्ट नोटची डिलीव्हरी झाली असा अर्थ असेल.

45. IT अधिनियम, 2000 चे अनुपालन करून ECN आणि इमेलची पोचपावती एक्सचेंजने विहीत केलेल्या पद्धतीने आणि SEBI/कमॉडिटी एक्सचेंजेने वेळोवेळी निर्गमित केल्याप्रमाणे अस्तित्वात असलेले नियम/परिपत्रके/मार्गदर्शक तत्त्वे यानुसार सदस्य सॉफ्ट आणि ढवळाढवळ न करता येण्याऱ्या स्वरूपात राखून ठेवेल. डिलीव्हरीचा पुरावा म्हणजेच कॉंट्रॅक्ट नोट पाठवताना प्रणालीने निर्माण केलेले लॉग रिपोर्ट सदस्याद्वारे SEBI/ कमॉडिटी एक्सचेंजेसद्वारे जारी केलेल्या अस्तित्वात असलेल्या नियम/परिपत्रके/ मार्गदर्शक तत्वांच्या अधीन विनिर्दिष्टीत केलेल्या कालावधीसाठी राखून ठेवले जातील. लॉग रिपोर्ट ग्राहकाला न पोचलेल्या कॉंट्रॅक्ट नोटचा/फेटाळलेल्या किंवा बाउन्स्ड बॅक झालेल्या इमेल्सचा तपशील पुरवेल. बाउन्स्ड मेल्स अधिसूचना मिळाल्याची खात्री करण्यासाठी सदस्य नेहमी SEBIच्या/कमॉडिटी एक्सचेंजेसच्या अस्तित्वात असलेल्या नियम/परिपत्रके/मार्गदर्शक तत्वांच्या अधीन ठरवून दिलल्या वेळेच्या आत सर्व आवश्यक पावले उचलेल.

46. जे ग्राहक कॉंट्रॅक्ट नोट इलेक्ट्रॉनिक स्वरुपात प्राप्त करण्याचा पर्याय निवडत नाहीत त्यांना प्रत्यक्ष पद्धतीने कॉंट्रॅक्ट नोट पाठविणे सदस्य सुरू ठेवेल. जेव्हा केव्हा ECN ग्राहकाला पोचलेल्या नसतील किंवा ग्राहकाच्या इमेल आयडी द्वारे फेटाळण्यात (मेल बाउन्स होणे) आलेल्या असतील, त्या त्या वेळी सदस्य SEBI/कमॉडिटी एक्सचेंजेसच्या अस्तित्वात असलेल्या नियमने/नियम उपकलमे, व्यावसायिक नियम आणि परिपत्रकांच्या अधीन ठरवून दिलेल्या वेळेच्या आत ग्राहकाला प्रत्यक्ष कॉंट्रॅक्ट नोट पाठवेल आणि अशा प्रत्यक्ष कॉंट्रॅक्ट नोटच्या डिलीव्हरीचा पुरावा राखून ठेवेल.

47. ग्राहकाला ECN कम्युनिकेशन व्यतिरिक्त, सदस्य त्याच वेळी त्याच्या नेमून दिलेल्या वेबसाइटवर, जर असेल, एका सुरक्षित मार्गाने ECN प्रसिद्ध करेल आणि ग्राहकाला संबंधित ॲक्सेस सक्षम करेल आणि ह्या हेत्वर्थ, तो ग्राहकाला कॉंट्रॅक्ट नोट इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जतन करण्याच्या आणि/किंवा त्याची प्रिन्ट आउट काढून घेण्याच्या पर्यायासह एक विशिष्ट यूजर नेम आणि पासवर्ड प्रदान करेल.

48. जो ग्राहक इलेक्ट्रॉनिक स्वरूपात कॉन्ट्रॅक्ट नोट मागतो त्यासाठी मिळवलेले इलेक्ट्रॉनिक कॉन्ट्रॅक्ट नोट (ECN) घोषणापत्र. हे घोषणापत्र ग्राहकाने रद्द करेपर्यंत वैध राहील.

**कायदे आणि न्यायक्षेत्र**

49. या दस्तऐवजात ठरवून दिलेल्या विशिष्ट हक्कांव्यतिरिक्त, सदस्य, अधिकृत व्यक्ती आणि ग्राहक, ज्या एक्सचेंजमध्ये व्यवहार करण्याची ग्राहक निवड करेल त्या एक्सचेंजचे नियम, उपकलमे आणि व्यावसायिक नियम आणि त्याखील निर्गमित करण्यात आलेली परिपत्रके/नोटीसेस किंवा SEBIचे नियम आणि नियमने यांच्या अधीन सदस्य किंवा ग्राहकाला असू शकतील असा इतर हक्कांचा वापर करण्यास पात्र आहेत.

50. या दस्तऐवजातील तरतूदी सदैव सरकारी अधिसूचना, SEBIने निर्गमित केलेले कोणतेही नियम, मार्गदर्शक तत्त्वे आणि परिपत्रके/नोटीसेस आणि जिथे व्यवहारांची कार्यवाही केली जाते त्या संबंधित कमॉडिटी एक्सचेंजच्या वेळोवेळी अंमलात असू शकतील अशी परिपत्रके, नियम, व्यावसायिक नियम आणि उपकलमांच्या अधीन असतील.

51. सदस्य आणि ग्राहक आर्बिट्रेशन अँड कन्सिलिएशन अधिनियम, 1996 खाली लवादाने दिलेल्या कोणत्याही निर्णयाचे पालन करतील. तथापि, कोणताही एक पक्ष लवादाच्या निर्णयाने समाधानी नसेल तर अपीलाची तरतूद आहे.

52. या दस्तऐवजात वापरलेल्या परंतु, यात व्याख्या न केलेल्या शब्दांचा आणि अभिव्यक्तींचा अर्थ, संदर्भानुसार अन्य असणे आवश्यक असल्याशिवाय, तोच असेल जो एक्सचेंजेस/SEBIचे नियम, उपकलमे, नियमने/व्यावसायिक नियम आणि त्याखाली निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्र/नोटीसेसमध्ये त्यांना ठरवून देण्यात आलेला आहे.

53. सदस्याने भर टाकलेली कोणतीही अतिरिक्त स्वेच्छेची/अनिवार्य नसलेली कलमे/दस्तऐवज एक्सचेंजेस/ SEBIचे नियम/व्यावसायिक नियम/ नोटीसेस/परिपत्रके यांचा भंग करणारे नसावेत. अशा स्वेच्छेच्या कलमांतील/दस्तऐवजा(जां)तील कोणताही बदल 15 दिवस आधीच्या सूचनेने करण्यात यावा. एक्सचेंजेस/SEBIने विनिर्दिष्टीत केलेल्या हक्क आणि कर्तव्यातील कोणतेही बदलसुद्धा अशीलांच्या नजरेला आणून दिले जावेत.

54. यातील पक्षांच्या हक्कांत आणि कर्तव्यांत SEBIच्या नियमांतील बदलांच्या परिणामी किंवा जिथे व्यवहारांची कार्यवाही केली जाते त्या संबंधित कमॉडिटी एक्सचेंजच्या उपकलमांतील, नियमांतील आणि व्यावसायिक नियमांतील बदलांमुळे बदलले गेले तर, असे बदल या दस्तऐवजात नमूद केलेल्या पक्षांच्या हक्कांतील आणि कर्तव्यांतील बदल म्हणून यात अंगीकृत करण्यात आले आहेत असे मानण्यात यावे.

55. सदस्यांनी दर महिन्याला आपल्या अशिलांना खात्याचे विवरणपत्र पाठवणे आवश्यक आहे.

**सदस्याद्वारे ग्राहकाला पुरविण्यात आलेली इंटरनेट आणि वायरलेस तंत्रज्ञानावर आधारित सुविधा**
**(*'हक्क आणि कर्तव्य'* दस्तऐवजा(जां)त नमूद केलेली सर्व कलमे लागू असतील. त्या व्यतिरिक्त, याठिकाणी नमूद केलेली कलमेसुद्धा लागू होतील.)**

1. मोबाइल फोन, डेटा कार्ड सहित लॅपटॉप, वगैरे अशा इंटरनेट प्रोटाकॉल (IP) चा वापर करणाऱ्या साधनांचा समावेश असेल अशा वायरलेस तंत्रज्ञानाच्या वापरामार्फत इंटरनेट आधारित व्यवहार (IBT) आणि कमॉडिटीजचा व्यवहार पुरविण्यास सदस्य पात्र आहे. सदस्याने SEBI आणि एक्सचेंजेस वेळोवेळी विनिर्दिष्टीत करू शकतील अशा वायरलेस तंत्रज्ञानाचा वापर करून इंटरनेट आधारित व्यवहारांना/ कमॉडिटीच्या व्यवहारांना लागू होतील अशा सर्व आवश्यकतांचे अनुपालन करावे.

2. ग्राहक कमॉडिटीजमध्ये गुंतवणूक करण्यास/व्यवहार करण्यास इच्छुक आहे आणि त्या हेत्वर्थ, ग्राहक एका इंटरनेट आधारित व्यवहाराच्या सुविधेचा किंवा वायरलेस तंत्रज्ञानामार्फत कमॉडिटीजचा व्यवहार करण्याच्या सुविधेचा वापर करण्यास इच्छुक आहे. सदस्य त्याची IBT सेवा ग्राहकाला पुरवेल, आणि ग्राहक SEBI/एक्सचेंजेसच्या तरतूदी आणि सदस्याच्या IBTवर विनिर्दिष्टित केलेल्या अटी आणि शर्तींवर आणि त्यांच्या अधीन, जर त्या एक्सचेंजेस/SEBIने विहीत केलेल्या नियमांना अनुसरून असतील तर, सदस्याच्या IBT सेवेचा लाभ घेईल.

3. सदस्याने वायरलेस तंत्रज्ञान/इंटरनेट किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानामार्फत कमॉडिटीजच्या व्यवहाराशी संबंधित वैशिष्ट्ये, जोखमी, जबाबदाऱ्या, कर्तव्ये आणि दायित्वे यांची ग्राहकाला जाणीव करून द्यावी.

4. सदस्याने ग्राहकाला जाणीव करून द्यावी कि सदस्याची IBT प्रणाली सुरवातीला स्वतःच पासवर्ड निर्माण करते आणि एक्सचेंजेस/SEBIने विहीत केलेल्या नियमांना अनुसरून ठरवून दिल्याप्रमाणे त्याचे पासवर्ड धोरण आहे.

5. यूजर नेम आणि पासवर्ड गोपनीय आणि सुरक्षित ठेवण्यासाठी ग्राहक जबाबदार असेल आणि कोणत्याही व्यक्तीने सदस्याच्या IBT प्रणालीद्वारे ग्राहकाचे यूजर नेम आणि/किवां पासवर्ड वापरून दिलेल्या सर्व आदेशांसाठी आणि व्यवहारांसाठी ग्राहक एकट्यानेच जबाबदार असेल, त्या व्यक्तीला तसे करण्याचा अधिकार असो वा नसो. तसेच ग्राहकाला जाणीव आहे कि ऑर्डर रुटेड प्रणालीमार्फत वायरलेस तंत्रज्ञानाच्या मार्गाने इंटरनेट व्यवहार/कमॉडिटीजमधील व्यवहारांसाठी अधिकृतता तंत्रज्ञाने आणि सुरक्षा उपाय आवश्यक आहेत आणि कर्मचारी आणि सदस्याचे डीलर्स यांच्यासहित कोणत्याही तिसऱ्या पक्षाला ग्राहकाचा आणि/किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीचा पासवर्ड उघड न करण्याची खात्री करण्याचे वचन देतो.

6. ग्राहक पासवर्ड विसरला, सदस्याच्या IBT प्रणालीत दोष आढळले, विसंगति आढळली/संशय आला/त्याच्या यूजर नेम/ पासवर्ड/ खात्याद्वारे अनधिकृत वापर झाल्याचे आढळे तर अशा अनधिकृत वापराचा संपूर्ण तपशील, तारीख, पद्धत आणि अशा अनधिकृत वापराच्या अनुषंगाने केलेले व्यवहार वगैरे सदस्याला ताबडतोब लेखी अधिसूचित करेल.

7. वायरलेस तंत्रज्ञानाच्या मार्गाने इंटरनेटवरून/कमॉडिटीज व्यवहाराचे आदेश मार्गस्थ करण्यासाठी सेवेचा लाभ घेण्याशी संबंधित असलेल्या जोखमींची ग्राहकाला जाणीव आहे आणि त्या त्याला समजल्या आहेत आणि

ग्राहकाच्या यूजरनेम/पासवर्डने कोणत्याही पद्धतीने केलेल्या कोणत्याही आणि सर्व कृतींसाठी ग्राहक पूर्णपणे जबाबदार आणि उत्तरदायी आहे.

8. सदस्य आदेश/व्यवहाराची पुष्टी ग्राहकाला त्याच्या विनंतीवरून इमेलमार्फत पाठवेल. ग्राहकाला जाणीव आहे कि आदेश/व्यवहाराची पुष्टी वेब पोर्टलवरून पुरविण्यात आलेली आहे. ग्राहक वायरलेस तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवहार करत असेल तर, सदस्य आदेश/व्यवहाराची पुष्टी ग्राहकाच्या उपकरणावर पाठवेल.

9. ग्राहकाला जाणीव आहे कि इंटरनेट वरून व्यवहार करण्यात अनेक अनिश्चीत घटक आणि क्लिष्ट हार्डवेअर, सॉफ्टवेअर, प्रणाली, संवादाच्या वाहिन्या, पेरिफेरल्स, वगैरे सामील असतात, ज्यात व्यत्यय येणे आणि ते स्थानभ्रष्ट होणे शक्य आहे. सदस्य  आणि एस्क्चेंज, सदस्याची IBT सेवा कोणत्याही व्यत्ययाविना ग्राहकाला सर्व काळ उपलब्ध असेल असे कोणतेही निवेदन करत नाहीत किंवा हमी देत नाहीत.

10. सदस्याच्या IBT प्रणालीचे कोणतेही प्रलंबन, व्यत्यय, अनुपलब्धता किंवा चुकीचे कार्य, किंवा एक्सचेंजची सेवा किंवा प्रणाली किंवा ग्राहकाच्या/सदस्याच्याच्या/एक्सचेंजच्या बाजूने, सदस्य/एक्सचेंजेसच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही कारणासाठी कोणताही दुवा/प्रणाली बंद पडण्यामुळे त्याच्या आदेशाची कार्यवाही न होणे यासाठी ग्राहकाचा एक्सचेंज किंवा सदस्याच्या विरोधात कोणताही दावा असणार नाही.

**जोडपत्र-4**

**मार्गदर्शन टिपण - ग्राहकांनी काय करावे आणि काय करू नये**

**काय करावे**

1. केवळ एक्सचेंजच्या नोंदणीकृत सदस्यांमार्फत (Members/ Stock Brokers) व्यवहार करा. खालील लिंकवरून एक्सचेंजच्या वेबसाईटवर तो सदस्य एक्सचेंजकडे नोंदणीकृत आहे का ते तपासून पाहा .......................................
2. तुम्ही व्यवहार सुरू करण्यापूर्वी प्रमाणित 'नो युवर क्लाएंट (KYC)' प्रपत्र पूर्ण भरण्यावर भर द्या.
3. युनिक क्लाएंट कोड (UCC) मिळवण्यावर भर द्या आणि तुमचे सर्व व्यवहार उपरोक्त UCC अंतर्गत केले जात असल्याची खात्री करा.
4. प्रमाणित 'जोखिम प्रगटन करार (रिस्क डिसक्लोजर एग्रिमेंट)' वाचून त्यावर स्वाक्षरी करण्यावर भर द्या.
5. तुमच्या KYC आणि/किंवा तुमच्या सदस्याने तयार केलेल्या इतर कागदपत्रांची सदस्याकडून प्रत मिळवा.
6. एक्सचेंजच्या वेबसाईटवर ....................................... ह्या लिंकवर उपलब्ध असलेल्या व्यवहार सत्यापन सुविधेद्वारे एक्सचेंजवर केल्या जात असलेल्या व्यवहारांचा खरेपणा पुन्हा तपासून पहा. व्यवहाराच्या तारखेपासून 5 कामकाजाच्या दिवसांपर्यंत व्यवहाराची माहिती उपलब्ध असते तिथे व्यवहारांचे ऑनलाईन सत्यापन करता येते.
7. केलेल्या प्रत्येक व्यवहारासाठी व्यवहार केल्यापासून 24 तासांमध्ये विनिर्दिष्ट स्वरूपणामध्ये योग्यप्रकारे स्वाक्षरी केलेल्या करार टिपेवर भर द्या ज्यामध्ये व्यवहाराचे तपशील तुमच्या UCC सह ठळकपणे मांडलेले असतील.
8. कराराच्या टिपेवर सर्व संबंधित माहिती असल्याची खात्री करा जसे की सदस्य नोंदणी क्रमांक, ऑर्डर क्र. ऑर्डर तारीख, ऑर्डर वेळ, व्यापार क्र., व्यापार दर, प्रमाण, लवादाचे कलम इ.
9. मार्जिनसाठी सदस्याकडे जमा केलेल्या आनुशंगिकची पावती मिळवा.
10. तुमचे आणि सदस्याचे अधिकार आणि कर्तव्ये जाणून घेण्यासाठी एक्सचेंजचे तसेच नियामक, शासन आणि इतर अधिकाऱ्यांचे नियम, उपकलमे, नियमने, परिपत्रके, डायरेक्टिव्ज, सूचना वाचा.
11. व्यवहार करण्यापूर्वी सर्व संबंधित प्रश्न विचारा आणि तुमच्या सदस्याकडून शंका दूर करून घ्या.
12. प्रत्येक व्यवहारपूर्तीला बिल घेण्यावर भर द्या.
13. तुमच्या खाते लेखाच्या मासिक विवरणपत्रांवर भर द्या आणि विवरणपत्रातील कोणत्याही दोषांबाबत कामकाजाच्या 7 दिवसांमध्ये तुमच्या सदस्याला कळवा. असमाधानकारक प्रतिसाद मिळाल्यास कृतीच्या कारणाच्या तारखेपासून कामकाजाच्या 15 दिवसांमध्ये एक्सचेंजला कळवा.
14. तुमच्या डिपॉझिटरी सहभागीकडून तुम्हाला मिळत असलेल्या व्यवहार आणि धारण विवरणपत्रांची बारकाईने तपासणी करा.
15. DP द्वारे जारी केल्या जात असलेले डिलिव्हरी इनस्ट्रक्शन स्लिप्स (DIS) बुक सुरक्षित ताब्यात ठेवा.
16. DIS नंबर्स आधी प्रिंट केलेले आहेत आणि DIS बुकवर तुमचा खाते क्रमांक (UCC) नमूद केलेला आहे याची खात्री करा.
17. दीर्घकालावधीसाठी तुम्ही अनुपस्थित असाल किंवा तुम्ही तुमचे डीमॅट खाते वरचेवर वापरत नसाल तर ते गोठवा.
18. आवश्यक मार्जिन्स वेळेवर आणि केवळ धनादेशाने अदा करा आणि सदस्याकडून त्याची पावती मागा.

19. विक्री केल्यास कमॉडिटी(Commodity) डिलिव्हर करा किंवा खरेदी केल्यास विहित कालावधीमध्ये पैसे अदा करा.
20. डेरिव्हेटिव्जसाठीची मानके समजावून घ्या आणि त्यांचे पालन करा.
21. तुम्ही आणि सदस्यामध्ये मान्य झालेली स्वेच्छिक कलमे, काही असल्यास, ती वाचून, समजावून घेऊन नंतर स्वाक्षरी करण्याची खात्री करा. तुम्ही आणि सदस्यामध्ये मान्य झालेले कलमे तुमच्या संमतीविना बदलता येत नाहीत याची नोंद घ्या.
22. व्यवहारासाठी सदस्य तुम्हाला आकारत असलेले ब्रोकरेज, कमिशन, फी आणि इतर शुल्क आणि संबंधित तरतुदी/ मार्गदर्शक तत्वांबाबत SEBI कमॉडिटी एक्सचेंजकडून स्पष्ट कल्पना घ्या.
23. सदस्याच्या नावे अकाउंट पेई धनादेशाने प्रदाने करा. तुमच्या प्रदान/ कमॉडिटींच्या सदस्याकडील डिपॉझिटचा तुमच्याकडे कागदोपत्री पुरावा असल्याची खात्री करा ज्यामध्ये, तारीख, कमॉडिटी, प्रमाण, कोणत्या बँक/ डिमॅट खात्यामध्ये आणि कोणत्या बँक/ डिमॅट खात्यामधून असे पैसे किंवा कमॉडिटीज (कोठार पावत्यांच्या स्वरूपात) जमा केल्या ते नमूद केलेले असेल.
24. फंड्सचे पेआउट किंवा कमॉडिटींची डिलिव्हरी (जसे प्रकरण असेल त्यानुसार) एक्सचेंजकडून पेआउट मिळाल्यापासून कामकाजाच्या एक दिवसामध्ये तुम्हाला केली जाणार नाही जर तुम्ही चालू असलेल्या खात्याची देखभाल करण्याबाबत विशिष्ट अधिकार तुमच्या सदस्याला दिले असतील. त्यामुळे, ह्याबाबतीत, तुम्ही चालू असलेल्या खात्याची देखभाल करण्याबाबत विशिष्ट अधिकार तुमच्या सदस्याला देणे हे खालील शर्तींच्या अधिन असेल:
    a) तुम्ही दिलेल्या अशा अधिकारांवर तारीख घातलेली असेल आणि केवळ तुम्हीच स्वाक्षरी केलेली असेल आणि ते तुम्हाला कधीही रद्द करता येण्याबाबतचे कलम त्यामध्ये नमूद केलेले असेल.
    b) तुमच्या खात्याच्या मासिक विवरणपत्रातून निर्माण होणाऱ्या कोणत्याही विवादाबाबत फंड्स/ कमॉडिटी किंवा विवरणपत्र जसे प्रकरण असेल त्यानुसार, मिळाल्यापासून, कामकाजाच्या 7 (सात) दिवसांमध्ये तुमच्या सदस्याला कळवले पाहिजे. विवाद असल्यास, संबंधित कमॉडिटी एक्सचेंजच्या (Commodity Exchanges) गुंतवणुकदार तक्रार निवारण सेलकडे तो विषय विनाविलंब लेखी तक्रारीच्या स्वरूपात दाखल करा.
    c) जर तुम्ही चालू असलेल्या खात्याची देखभाल करण्याबाबत निवड केली नसेल आणि एक्सचेंजकडून पेआउटची पावती मिळाल्यानंतरच्या कामकाजाच्या दिवशी पेआउट मिळाला नाही तर, कृपया हा विषय सदस्याला कळवा. विवाद असल्यास, तुम्ही संबंधित कमॉडिटी एक्सचेंजच्या गुंतवणुकदार तक्रार निवारण सेलकडे तो विषय विनाविलंब लेखी तक्रारीच्या स्वरूपात दाखल कराल याची खात्री करा.
    d) व्यवहार पुष्टी चेतावण्या/ व्यवहारांचे तपशील SMS किंवा ईमेलने व्यवहाराच्या दिवसाच्या शेवटी कमॉडिटी एक्सचेंजकडून मिळावा यासाठी कृपया तुमचा मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी सदस्याकडे नोंदवा.
25. तुम्ही तुमच्या सदस्याकडे जमा करत असलेल्या पैसे किंवा इतर मालमत्तेच्या संरक्षणाबाबत तुम्ही ओळख करून घेतली पाहिजे, खासकरून कमॉडिटी डेरिव्हेटिव्ज (Commodity Derivatives)मार्केटमध्ये सदस्य कसूरदार असल्यास किंवा सदस्य नादार किंवा दिवाळखोर बनल्यास.
26. असे पैसे किंवा मालमत्ता सदस्याकडे जमा केल्या तुमच्याकडे कागदोपत्री पुरावा असल्याची खात्री करा, ज्यामध्ये हे पैसे किंवा मालमत्ता कोणत्या खात्यासाठी जमा केली आहे ते नमूद केलेले असावे.

27. समजा तुमची समस्या/तक्रार/अडचण संबंधित सदस्याने/अधिकृत व्यक्तीने न सोडवल्यास तुम्ही तो विषय संबंधित कमॉडिटी एक्सचेंजकडे नेऊ शकता. तुमच्या तक्रारीच्या निवारणाने तुम्ही समाधानी न झाल्यास तुम्ही तो विषय SEBI कडे नेऊ शकता.

**हे करू नये**

1. नोंदणी न केलेल्या कोणत्याही मध्यस्थासह व्यवहार करू नका.
2. ऑफ-मार्केट व्यवहार करू नका कारण असे व्यवहार बेकायदेशीर असतात आणि एक्सचेंजच्या न्यायाधिकारक्षेत्राच्या बाहेर असतात.
3. कोणत्या सदस्यासह हमीपात्र परताव्याच्या तरतुदींमध्ये समाविष्ट होऊ नका
4. फसव्या जाहिराती, अफवा, हॉट टिप्स, परताव्याचे स्पष्ट/पूर्ण वचन याच्या मोहात पडू नका
5. रोख पैसे भरणा करू नका/ मार्जिन आणि सेटलमेंटसाठी सदस्याकडून कोणतीही रोख रक्कम घेऊ नका.
6. जोखीम प्रकटीकरण करार वाचून आणि समजून घेण्याआधी ट्रेडिंग सुरू करू नका.
7. फोनवर दिलेल्या उच्च मूल्याच्या ऑर्डर्स लिहून ठेवण्याकडे दुर्लक्ष करू नका.
8. स्वाक्षरी न केलेली/डुप्लिकेट करार टीप/पुष्टी मेमो स्वीकारू नका.
9. कोणत्याही अनधिकृत व्यक्तीने स्वाक्षरी केलेली करार टीप/पुष्टी मेमो स्वीकारू नका.
10. तुमचा इंटरनेट व्यवहाराच्या खात्याचा संकेतशब्द कोणाही बरोबर सामायिक करू नका
11. सभासदाकडे कमॉडिटींचे प्रदान/डिलिव्हरीला विलंब करू नका.
12. गुंतवणूकीतील धोके लक्षात ठेवायला विसरू नका.
13. कमॉडिटी, डिपॉजिट्स जमा करताना कोऱ्या बँक डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप्सवर (DIS) स्वाक्षरी करू नका आणि/किंवा वेळ वाचवण्यासाठी डिपॉझिटरी सहभागी (DP) कडे जमा करून ठेवू नका.
14. एक्सचेंजने निर्धारित केलेल्या दरांहून अधिक ब्रोकरेज देऊ नका
15. अधिकृत व्यक्तीच्या (Authorized Persons)नावाने धनादेश देऊ नका.

**जोडपत्र अ**

# इलेक्ट्रॉनिक करार नेट्स (ईसीएन) — घोषणा
# (स्वेच्छिक)

प्रति,
(एक्सचेंजमधील सदस्याचे नाव)
प्रिय सर,

मी,________________________________, ______________________________________एक्सचेंजचे सदस्य मे. ____________________________ ह्यांचा/ची ग्राहक खालीलप्रमाणे जबाबदारी घेतो/ते:

- मला माहीत आहे की मी दाखल केलेल्या सर्व व्यवहारांच्या बाबतीत सदस्याने प्रत्यक्ष करार नोट प्रदान करावी लागते जोपर्यंत मला स्वतःला ती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात नको असेल तोपर्यंत.
- मला माहीत आहे की सदस्याने केवळ माझ्या विनंतीनुसार माझ्या सोयीसाठी इलेक्ट्रॉनिक नोट प्रदान करायची असते.
- जर सदस्याने प्रत्यक्ष करार नोट देणे आवश्यक अशले तरी प्रत्यक्ष करार नोट प्राप्त करणे माझ्यासाठी गैरसोयीचे असल्याचे माझ्या लक्षात आले. त्यामुळे मी केलेल्या/ऑर्डर केलेल्या सर्व व्यवहारांची इलेक्ट्रॉनिक करार नोट पाठविण्याची मी स्वेच्छेने विनंती करत आहे.
- मला संगणकाचा ॲक्सेस आहे आणि मी नियमीतपणे संगणक वापरत असून मला ईमेल वापरण्याचे पुरेसे ज्ञान आहे.
- माझा ईमेल आयडी आहे*_____________________________________ . हे मी स्वतः तयार केले आहे आणि इतर कोणी नाही.
- मला माहीत आहे की हे घोषणापत्र इंग्रजी किंवा मला ज्ञात असलेल्या इतर कोणत्याही भाषेमध्ये असावे.
- मला माहीत आहे की बाउन्स झालेले नोटिफिकेशन सदस्याला प्राप्त न झाल्यास वरील ईमेल आयडीवर कराराची नोट पाठवली जाईल.

*वरील घोषणा आणि ईसीएन वर दिलेली मार्गदर्शक तत्वे हे जोडपत्र आहे आणि ते मी वाचले आणि समजून घेतले आहे. प्रत्यक्ष करार नोट पाठवण्यामध्ये समाविष्ट असलेल्या जोखमीबाबत मला जाणीव आहे आणि त्याची पूर्ण जबाबदारी घेतो/ते.*

- *(ईमेल आयडी ग्राहकाने स्वतःच्या हस्ताक्षरांत लिहावा)*

ग्राहकाचे नाव:________________________________________

वैशिष्ट्यपूर्ण ग्राहक संकेतांक:____________________________

पॅन:_______________________________________________

पत्ता:______________________________________________

ग्राहकाची स्वाक्षरी

तारीख:

स्थळ:

ग्राहकाच्या स्वाक्षरीची पडताळणी करणारा,

सदस्याच्या नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याचे नाव

स्वाक्षरी